MHJN090007492025

नि.दि.दावा क्र. ९२/२०२५

महेंद्र वि. धनंजय.

**नि.क्र. १६ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा मिळकतीवर प्रतिवादी यांनी ''जैस थे'' परिस्थिती ठेवणेबाबत दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या मते, वादी यांनी सदरची मिळकत ही प्रतिवादी यांच्या पासुन ताबा इसार पावती करारनाम्या आधारे घेतली असुन सदर मिळकत ही वादी यांच्या ताब्यात आहे. वादी यांनी दावा मिळकत त्यांच्या ताब्यात असल्याबाबत दत्तु तिडके यांचे शपथपत्र दाखल केले आहे. प्रतिवादी हे वादी यांना जिवे मारण्याच्या व वहिती न करण्याच्या धमक्या देत आहेत. दावा हा मनाई अर्जाच्या युक्तीवादाकामी प्रलंबीत आहे. मनाई अर्ज गुणदोषावर निकाली निघेपर्यंत दावा मिळकतीत प्रतिवादी यांनी "जैसे थे" परिस्थीती ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज मंजुर होण्याची विनंती केली.

३. दाव्याचे कामी प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवुनही त्यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. करीता अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय निकाली काढण्यात येतो.

४. सदर प्रकरण हे नि.क्र.५ चे युक्तीवाद कामी नेमण्यात आले असुन प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ हे गैरहजर असुन वादी यांनी सदर दावा हा प्रतिवादींविरुद्ध करारपुर्ती करीता व शाश्वत मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. त्यामुळे नि.क्र.५ वरील अर्ज गुणदोषावर निकाली काढण्याकरीता अल्पसा वेळ जाणार आहे. वादी यांनी अर्जासोबत त्यांचे शपथपत्र दाखल केले आहे. वाद मिळकतीचे अस्तीत्व टिकविण्यासाठी निशाणी ५ च्या आदेशापर्यंत वाद मिळकतीत "जैसे थे" परिस्थिती कायम ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे,

खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात आला.

२. प्रतिवादी यांना निर्देशीत करण्यात येते की त्यांनी निशाणी ५ च्या आदेशापर्यंत वाद मिळकतीमध्ये ''जैसे थे" परिस्थिती कायम ठेवावी.

स्वा/–

दि.०७.०५.२०२६

(श्री. जी.एन. लंघे )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बदनापूर.